**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १४४/२०२२**

**मध्ये निशाणी क्र. १ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज भारतीय वारस कायदा १८२७ चे कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२) तुकाराम शिवाजी गाडे हे दिनांक ०३/०४/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. मयत तुकाराम शिवाजी गाडे हयांना सामनेवाला क्र.१ हे वडील व क्र.२ ही आहे आहे. अर्जदार क्र.१ ही पत्नी व क्र.२ हा मुलगा आहे. अर्जदार व सामनेवाला शिवाय मयत तुकाराम शिवाजी गाडे हयांना दुसरे कोणीही वारस नाही. मयत तुकाराम शिवाजी गाडे हयांच्या वारस दाखल्याची अर्जदारांना शासकिय व निमशासकीय कामा करिता आवश्यकता लागणार आहे. सबब त्यांचे पश्चात अर्जदार हे त्यांचे वारस असल्याचे ठरवून मिळण्यासाठी प्रस्तुचा अर्ज केलेला आहे.

३) दिनांक ०३/०३/२०२३ च्या दैनिक सागर रायगड या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस निशाणी क्र.२१ वर प्रसिध्द करण्यात आली व अर्जाबाबत कोणाचीही काहीही हरकत असल्यास ती मागविण्यात आली. परंतु सदर प्रकरणात आजपावेतो कोणीही हरकत घेतलेली नाही.

४) खालील मुददे माझे समक्ष विचारार्थ उपस्थित होतात. त्या मुददयांपुढे मी माझे निष्कर्ष नोंदविले असुन त्यांची कारणमिमांसा त्याखाली केली आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जदार हे वारसा दाखला मिळण्यास हक्कदार आहे काय? | होय. |
| २) | आदेश काय? | अंतिम आदेशा प्रमाणे |

:: **कारणमिमांसा** ::

५) सामनेवाला क्र.१ व क्र.२ हयांनी आपले कथन शाबित करण्यासाठी **नि.क्र.१२ व नि.क्र.१३** वर प्रतिज्ञापत्र, अर्जदार हयांनी आपले कथन शाबित करण्यासाठी **नि.क्र.१६** वर सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र, **नि.क्र.१७** मयत तुकाराम शिवाजी गाडे हयांच्या मृत्युप्रमाणपत्राची मुळप्रत, **नि.क्र.१८** मयत तुकाराम शिवाजी गाडे हयांच्या कंपनीचे ओळखपत्राची मुळप्रत, **नि.क्र.१९** अर्जदार क्र.१ हयांची आधारकार्डाची पडताळणी प्रत, **नि.क्र.२०** अर्जदार क्र.२ हयांची आधारकार्डाची पडताळणी प्रत, **नि.क्र.२१** वर जाहिर नोटीस दाखल केलेली आहे.

६) अर्जातील कथन, अर्जदाराशी व सामनेवाला हयाच्याशी मयताचे नाते संबंध तसेच त्यांनी दाखल केलेले कागदपत्र हयावरुन अर्जदार हे वारस दाखला मिळण्यास पात्र आहेत, असे दिसून येते. तसेच अर्जदाराचे कथन हे बिनविरोध राहिलेले आहे. तसेच सामनेवाला क्र.१ श्री. शिवाजी राघो गाडे हयानी नि.क्र.१२ व क्र.२ सौ. सुरेखा शिवजी गाडे हयानी नि.क्र.१३ वर म्हणणे करून अर्जदाराच्या नावे वारस दाखला देण्यास कोणतीही हरकत नाही, असे कथन केले आहे. एकंदरीत वरील चर्चेनुसार मी मुददा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देऊन मुददा क्र.२ च्या निष्कर्षाकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार श्रीमती रंजना तुकाराम गाडे व हर्षल तुकाराम गाडे हयांना तुकाराम शिवाजी गाडे हयांचे वारस असल्याचा दाखला योग्य ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर देण्यात यावा.

३) येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येतो.

**खुल्या न्यायालयात जाहिर.**

Digitally signed by LATA KIRAN SAPKAL
Location: Khalapur, Dist Raigad
Date: 2023.04.20 17:46:13 +0530

स्थळ : खालापुर. ( ल. कि. सपकाळ )
दिनांक : २०/०४/२०२३. २ रे सहदिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खालापूर.